**ठळक बातम्या**

- इराण-इस्रायल संघर्षात अमेरिकेची उडी, इराणच्या तीन आण्विक तळांवर हल्ला /संयुक्त राष्ट्रांकडून चिंता व्यक्त /तणाव कमी करण्यासाठी संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग आवश्यक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मत

- संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाला 75 वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्त उद्या आणि परवा मुंबईत विधान भवनात महत्त्वपूर्ण राष्ट्रीय परिषद

- लडाखमध्ये आयोजित सरहद शौर्यथॉनचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

- पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेनं केली दोन जणांना अटक

**आणि**

- आषाढ वारीसाठी संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर पालख्या पुण्याहून रवाना

**<><><><>**

इराणच्या तीन आण्विक तळांवर हल्ला करुन अमेरिकेनं इराण-इस्रायल संघर्षात जाहीररीत्या उडी घेतली आहे. दहशतवादी कारवायांना रसद पुरवणाऱ्या देशाला लगाम घालण्यासाठी इतर कोणताही पर्याय शिल्लक राहिला नसल्यानं अमेरिकेनं नाईलाजास्तव ही कारवाई केल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी म्हटलं आहे. इराणने आता शांतता प्रस्थापित करावी असं आवाहनही त्यांनी केलं आहे. अमेरिकेच्या या कारवाईचं इस्राएलनं स्वागत केलं आहे. त्यापाठोपाठ इस्रायलनं पश्चिम इराणमधल्या लष्करी तळांवर क्षेपणास्त्र हल्ले केले आहेत.

अमेरिकेनं केलेला हल्ला आंतरराष्ट्रीय कायदा, संयुक्त राष्ट्रांची सनद आणि अण्वस्त्र प्रसार विरोधी कायद्याचं उल्लंघन करणारा असल्याचं सांगत इराणने तीव्र निषेध व्यक्त केला आहे.  या हल्ल्याचे दूरगामी परिणाम होतील, असा इशाराही इराणनं दिला आहे.

हल्ला झालेल्या फोर्डो, नतांज आणि एस्फहान इथं निवासी भागात कुठलाही किरणोत्साराचा धोका सर्वेक्षणात आढळलेला नाही, तसंच आपला अणुकार्यक्रम जारी राहील, असं इराणच्या अणुऊर्जा संस्थेनं म्हटलं आहे.

दरम्यान, संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरस यांनी अमेरिकेच्या इराणवरच्या हल्ल्यांमुळे पश्चिम आशियातला संघर्ष नियंत्रणाबाहेर जाऊ शकतो, असा इशारा दिला आहे. अमेरिकेचे हल्ले हा आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेसाठी एक मोठा धोका असल्याचं गुटेरस यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><>**

पश्चिम आशियात सुरु झालेल्या संघर्षाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज इराणचे अध्यक्ष मसऊद पेझेश्कियान यांच्याकडे तीव्र चिंता व्यक्त केली. दोघांमधे यासंदर्भात तपशीलवार चर्चा झाली आणि पेझेश्कियान यांनी आपली भूमिका मांडली असं मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधे म्हटलं आहे.

या क्षेत्रातला तणाव कमी करणं गरजेचं असून त्याकरता संवादाचा आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारणं या भागातल्या शांतता, स्थैर्य आणि सुरक्षेच्या दृष्टीनं आवश्यक असल्याचं मोदी यांनी सांगितलं. भारत नेहमीच शांतिस्थापनेच्या बाजूने असेल याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

इराणमधून भारतीयांना सुखरुप मायदेशी आणण्यात दिलेल्या पाठिंब्याकरता मोदी यांनी पेझेश्कियान यांचे आभार मानले. दोन्ही नेत्यांनी व्यापार, आर्थिक सहकार्य आणि विज्ञान तंत्रज्ञान अशा विविध मुद्यांवर चर्चा केली.

**<><><><>**

संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाला 75 वर्षे पूर्ण होत असून, या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त एक महत्त्वपूर्ण राष्ट्रीय परिषद उद्या आणि परवा मुंबईत विधान भवनात आयोजित केली आहे.

या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत "प्रशासकीय कामं सक्षमपणे आणि कमी खर्चात होण्याकरता अर्थसंकल्पीय अंदाजांचं पुनर्विलोकन आणि प्रभावी नियंत्रणात अंदाज समितीची भूमिका" या विषयावर विचारमंथन होईल. परिषदेच्या समारोपानंतर लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांची वार्ताहर परिषद होईल.

संसदेच्या तसंच सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अंदाज समित्यांचे समिती प्रमुख आणि सदस्य या परिषदेत सहभागी होणार आहेत. विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे सर्व सदस्य आणि राज्यातले संसद सदस्य देखील या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

<><><><>

कारगील विजय दिवसानिमित्त लडाखमध्ये आयोजित सरहद शौर्यथॉनला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज हिरवा झेंडा दाखवला. या मॅरेथॉनमध्ये देशभरातून अडीच हजारांहून अधिक धावपटू सहभागी झाले असून यातून देशाचा आपल्या लष्करावरचा दृढ विश्वास दिसून येत असल्याचं शिंदे यांनी यावेळी सांगितलं. भारतीय लष्कर आणि सरहद संस्थेनं आयोजित केलेला हा उपक्रम जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये शांतता, देशभक्ती आणि पर्यटन या दृष्टीनं महत्त्वपूर्ण आहे, असं ते म्हणाले. कारगिल युद्ध स्मारकासाठी महाराष्ट्र सरकारतर्फे तीन कोटी रुपयांचा धनादेश त्यांनी यावेळी लष्कराकडे सुपूर्द केला.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षात भारतानं सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांवर आधारित उपक्रमांमधून लक्षणीय बदल घडवला आहे. गेल्या दशकभरात भारतातल्या उर्जाक्षेत्रात मागणी आणि पुरवठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. त्यात नवीकरणीय आणि अपारंपरिक उर्जास्रोतांचा मोठा वाटा आहे. जून २०२५ पर्यंत देशाची एकूण उर्जाउत्पादन क्षमता ४७६ गिगावॅट्सपर्यंत पोहोचली आहे. सौर उर्जेच्या बाबतीत भारताचा आता जगात तिसरा क्रमांक लागतो तर पवन उर्जेच्या बाबतीत भारत जगात चौथ्या क्रमांकावर आहे.

<><><><>

पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी एनआयए या राष्ट्रीय तपास यंत्रणेनं दोन जणांना अटक केली आहे. परवैझ अहमद जोथार आणि बशीर अहमद जोथार अशी त्यांची नावं असून त्यांच्याकडून आणखी तीन दहशतवाद्यांची महिती मिळाली असल्याचं एनआयएच्या सूत्रांनी सांगितलं. ते तिघे पाकिस्तानी नागरिक असून लष्कर ए तैयबाशी संबंधित आहेत. पहलगाममधे हिल पार्क इथं परवैझ आणि बशीर यांनी या तिघांना अन्न, निवारा आणि इतर मदत दिली होती. पुढचा तपास सुरु आहे.

<><><><>

आषाढ वारीसाठी संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांच्या पालख्या आज पुण्यातून हडपसरमार्गे पुढे पंढरपूरसाठी मार्गस्थ झाल्या. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी

दिवेघाटमार्गे सासवडला जाणार आहे. तर,संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा मुक्काम आज लोणी काळभोर इथं असेल.

संत मुक्ताबाई पालखीचं आज बीड शहरात स्वागत झालं.

संत निवृत्तीनाथ महाराजांची पालखी आज संध्याकाळी अहिल्यानगरमधे पोहोचली. पोलिस प्रशासन आणि महानगरपालिकेच्या वतीने दिंडीचं स्वागत करण्यात आलं. आज शहरात मुक्काम करुन उद्या ही दिंडी पंढरपूरकडे मार्गस्थ होईल.

राज्यभरातून आषाढीसाठी अनेक दिंड्या पंढरपूरकडे येत आहेत. राज्यातल्या ८० शहरांतून चार हजार सायकलची दिंडी पंढरपुरात येऊन पोहोचली आहे. सायकल स्वारांनी वारकरी परंपरेप्रमाणं सायकल वरून नगरप्रदक्षिणा केली. केंद्रीय राज्य मंत्री रक्षा खडसे, जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी सायकल दिंडीचं उद्घाटन करून दिंडीत सहभाग घेतला. आरोग्यमय भारत या राष्ट्रीय कार्यक्रम अंतर्गत या दिंडीमध्ये सायकल सारख्या व्यायामाचं महत्त्व पटवून देण्यात आलं.

**<><><><>**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर इथं स्वच्छता अभियानाला आजपासून सुरुवात झाली. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यावेळी उपस्थित होते. आज सकाळी शहरात ४२ ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यात १४८ टन कचरा गोळा करण्यात आला. आषाढी वारीच्या आधीची ही स्वच्छता मोहीम असून वारीनंतरही अशी मोहीम राबवली जाणार असल्याचं गोरे यांनी सांगितलं.

**<><><><>**

लंडनमध्ये अँडरसन - तेंडुलकर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात इंग्लंडनं कालच्या ३ बाद २०९ धावांवरुन आज पुढचा खेळ सुरु केला. शतकवीर ओली पोप १०६ धावांवर बाद झाला. शेवटची बातमी हाती आली तेव्हा इंगल्ंडच्या ६ बाद ३८८ धावा झाल्या होत्या.

भारतानं पहिल्या डावात यशस्वी जयस्वाल, कर्णधार शुभमन गिल, ऋषभ पंत यांच्या शतकांच्या जोरावर ४७१ धावा केल्या आहेत. त्यामुळे या डावात इंग्लंड अद्याप पिछाडीवर आहे.

लीड्समधे हेडिंग्ले मैदानावर सुरु असलेल्या या सामन्याचा आज तिसरा दिवस आहे.

<><><><>

नाशिक इथं होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजी नगर-नागपूर-खानदेश रस्ता तसंच सहा दिशांकडून नाशिककडे येणाऱ्या राष्ट्रीय महामार्गांचं रुंदीकरण करायला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज नागपुरात वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली. हैदराबाद इथं केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्र्यांनी कुंभमेळ्याच्या तयारीसाठी आढावा बैठक घेतली. त्यात हा निर्णय झाला. नाशिकमधे इतर सुविधा करण्याबाबतही केंद्रीय मंत्री गडकरी यांनी मान्यता दिल्याचं मुख्यमंत्र्यांनी वार्ताहरांना सांगितलं. यासोबतच नागपुरातील नाग नदी पुनरुज्जीवन प्रकल्पा अंतर्गत जपानमधील जायका पुरस्कृत कंपनीद्वारे सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प, भूमिगत वीजवाहिनी तसंच खाजगी बसगाड्यांच्या वाहनतळाबद्दल या बैठकीत चर्चा झाल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

<><><><>

व्यावसायिक अभ्यासक्रमाचं शिक्षण विद्यार्थिनींसाठी मोफत असल्यानं त्यासाठी कोणतंही शुल्क आकारू नये, असे आदेश उच्च आणि तंत्रशिक्षण विभागानं दिले आहेत. विद्यार्थिनींसाठी मोफत उच्च शिक्षण योजनेच्या अंमलबजावणीबाबत उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात आयोजित बैठकीत पाटील यांनी हे आदेश दिले.

<><><><>

राज्यात कोकण, घाटमाथ्यासह विदर्भ आणि मराठवाड्यातल्या काही भागात पावसाचा जोर कायम आहे. कोकण किनारपट्टीवर उंच लाटा उसळण्याचा इशारा भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्रानं दिला आहे. पुढचे चोवीस तास रायगड, रत्नागिरी आणि पुणे घाट परिसराला ऑरेंज अलर्ट दिला आहे. तसंच पश्चिम किनारपट्टीवर समुद्र खवळलेला राहिल, मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये, असा इशाराही दिला आहे.

//<><><><>//